महाराष्ट्र शासन

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा

**Chhatrapati Sambhaji Maharaj Government Medical College and Hospital Satara,**
**467, Sadar bazar, Camp, Satara 415001**

Phone No 02162-299763 Email Id :- deangmcsatara7@gmail.com

जा.क्र.छसंमशावैमवरुसा/ प्राध्या.,सहयोगी प्राध्या./ जाहिरात/ ४८५८/२०२५ दि.१८/११ /2025

प्रति,

मा. आयुक्त,

वैद्यकीय शिक्षण व संशोधन,

मुंबई

छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा या संस्थेच्या आस्थापनेवरील प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक यांची पदे निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर निवड मंडळ समितीच्या शिफारशी नुसार ३६४ दिवसांकरीता पदे भरण्यासाठी खालीलप्रमाणे जाहीरात तयार करण्यात आलेली आहे. सदर जाहिरात प्रसिध्द करण्यास मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे.

## जाहिरात

**विषय** :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथील चिकित्सालयीन विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमाफ्रत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत..

**संदर्भ** :- १) शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. संकीर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि.१७-१२-२०१६

२) वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग शासन निर्णय क्र.एलईसी-२०२१/प्र.क्र.१९९/वैसेवा-३ दिनांक ०९-०२-२०२२.

३) आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांची प्राप्त सूचना दि. १९/११/२०२५

संचनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखाली छत्रपती संभाजी महाराज शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, सातारा येथे वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरीता चिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावर करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता निव्वळ व तात्पुरत्या स्वरुपात भरण्याकरीता इच्छूक पात्र उमेदवारांकडून ऑफलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या www.med-edu.in/ संस्थेच्या संकेतस्थळावर या संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते दि.२५/ १२ /२०२५ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत शासकीय सुटटी वगळून अर्ज ऑफलाईन पध्दतीने स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन अपलोड करणे अनिवार्य राहील. अर्ज करण्यासाठी लिंक www.med-edu.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीबाबतची माहिती संचालनायाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

Scanned with OKEN Scanner

संवर्ग- प्राध्यापक

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | २ | MD /DNB (Medicine) | |
| २ | मनोविकृती शास्त्र | १ | M.D. (Psychiatry) / M.D. (Psychological Medicine)/ M.D. (Medicine with Diploma in Psychological Medicine) / DNB (Psychiatry) | As per notification १४/०२/२०२२<br>१ Associate Professor in the subject for three years in a permitted /recognized medical college /institution.<br>२.Should have at least four Research publications (At least two as Associate Professor)<br>(Only original papers meta-analysis, systematic reviews, and case series that are published in journals indexed in Medicine, PubMed Central, Science Citation Index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Access Journals(DOAJ) will be considered.)<br>२. Should have completed the Basic course in Biomedical Research from Institutions designed by NMC. |
| ३ | क्षयरोग व उररोगशास्त्र | १ | M.D. (Tuberculosis)/ M.D. (Tuberculosis & Respiratory Diseases) / M.D. (Medicine with T.D.D., DTD OR D.T.C.D.) M.D.(TB & Chest Diseases)/ DNB (Respiratory Diseases) | |
| ४ | कान, नाक, घसा शास्त्र | १ | MS/DNB (Oto-Rhino Laryngology) | |
| ५ | क्ष- किरणशास्त्र | १ | MD/DNB (Radio Diagnosis) | |
| ६ | स्त्रीरोग व प्रसूतीशास्त्र | १ | MD/ DNB (OBGY) | |
| | एकूण | ०७ | | |

Scanned with OKEN Scanner

**सहयोगी प्राध्यापक-**

| अ.क्र. | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | औषधवैद्यकशास्त्र | २ | MD /DNB (General Medicine) | As per notification १४/०२/२०२२<br>१ Assistant Professor in the subject for three years in a permitted /recognized medical college /institution.<br>२.Should have at least four Research publications. (Only original papers meta-analysis, systematic reviews, and case series that are published in journals indexed in Medicine, PubMed Central, Science Citation Index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Access Journals(DOAJ) will be considered.)<br>२. Should have completed the Basic course in Biomedical Research from Institutions designed by NMC.<br>As per Notification १४.०२.२०२२<br>Special training for Three years in the respective new broad speciality subject in teaching institution / centre of excellence with dedicated service in that speciality |
| २ | शल्यचिकित्साशास्त्र | २ | MS/DNB (General Surgery) | |
| ३ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | MS/DNB (Orthopaedics) | |
| ४ | शरिरविकृतीशास्त्र | २ | MD/DNB (Pathology) | |
| ५ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | १ | MD/MS/DNB (Obstetrics and Gynaecology) | |
| ६ | क्ष- किरणशास्त्र | १ | MD/DNB (Radio Diagnosis) | |
| ७ | इर्मजन्सी मेडिसीन | १ | MD/DNB-Emergency Medicine<br>OR<br>MD/MS/DNB<br>१.General Medicine<br>२.Anaesthesia<br>३. Respiratory Medicine<br>४. General Surgery<br>५. Orthopaedics<br>Notification date- २१.०७.२००९ Hence the relaxation is extended by five years from the date of the notification of these Regulations. | |
| ८ | बधिरीकरणशास्त्र | १ | MD Anaesthesiology | |
| | एकूण | ११ | | |

Scanned with OKEN Scanner

टीप- सदर माहिती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पूर्णपणे रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

**महत्वाची टीप-**

१ उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२ उमेदवाराचे वय नियुक्ती वेळेस दिनांक ०५/१२/२०२५ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३ प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहित केलेली आवश्यक अहर्ता धारण करणारे खाजगी व अन्य क्षेत्रातील उमेदवार बिगर सेवानिवृत्त पात्र असतील.

**४.मानधन-**

अ. सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास यांना शासन निर्णय दिनांक १७/१२/२००६ मधील तरतुदीनुसार दरमहा खालीलप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील.

| अ.क्र. | पदनाम | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकित्सालयीन - सातारा | २,००,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन - सातारा | १,८५,०००/- |

**५.गुणांकन पध्दत:-** जाहिराती सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमूद करण्यात आली आहे.

अ)परिशिष्ट-अ मध्ये नमूद नुसार १ ते ४ वरील एकूण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवाराना प्रत्यक्ष कागदपत्रे पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

ब)प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांपैकी किमान ४१ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळवणा-या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरीता विचार केला जाईल.

**नियम व अटी-**

१. करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी या पैकी जे आधी घडेल इतका राहील. तथापी सदरहू पदावर नियमित उमेदवार उपलब्ध झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.
२. उमेदवाराचे कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवतर्वणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसुचनेशिवाय संपुष्टात येईल.
३. करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकानुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नेमून दिलेली विवक्षीत कामे पार पाडणे आवश्यक राहील.

Scanned with OKEN Scanner

४. वरील प्रमाणे विहित कामकाज पार पडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदा-यावर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी व वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधीत कोणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६. करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमितिक रजा अनुज्ञेय असेल.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणारी कागदपत्रे/माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

८. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाही.

९. उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर किमान एक शैक्षणिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आशयाचे शपथपत्र सादर करणा-या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल शैक्षणिक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थ्यांचे हित विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकारला जाणार नाही.

१०. बिगर सेवानिवत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणा-या अध्यापकांची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ अनुज्ञेय असणार नाहीत.

११. अर्जदाराने संबंधित पदासाठी शारिरीक दृष्टया पात्र असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करावे.

१२. सदर जाहिरातीमधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहीरात पूर्णत: रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

१३. अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल.

१४. अर्जदाराचे नाव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१५. उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१६. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मूळ कागदपत्रे सोबत येताना आणणे बंधनकारक राहील.

डॉ. विनायक काळे

अधिष्ठाता,

छत्रपती संभाजी महाराज शासकीय

वैद्यकीय महाविद्यालय, सातारा.

**अधिष्ठाता**
**छत्रपती संभाजी महाराज**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सातारा.**

Scanned with OKEN Scanner